जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (कृषी) संवर्गातील कृषी अधिकारी यांची दि.०१.०१.२०१७ रोजीच्या अंतिम ज्येष्ठता सूची दुरूस्ती......श्री.एस.एन.औंधकर,कृषी अधिकारी, जि.प.अमरावती

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जिपअ-२०१८/ प्र.क्र.१६/आस्था-४

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
तारीख: १७ जुलै, २०१९

वाचा:- १) शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग, क्र. झेडएनजी-२०१६/प्र.क्र.६०/आस्था-४, दि. ४ मे,२०१७.
२) उप सचिव,कृषी व पदुम विभाग यांचे क्र.आकृवि १०१७/प्र.क्र.३१३/१५-अे, दि.१७.०५.२०१८ रोजीचे पत्र.
३) शासन पत्र,ग्रामविकास विभाग क्र.झेडएनजी-२०१६/प्र.क्र.६०/आस्था-४, दि.२२.०५.२०१८ रोजीचे पत्र.
४) शासन परिपत्रक,ग्रामविकास विभाग क्र.जिपअ-२०१८/प्र.क्र.१६/आस्था-४, दि.१०.१०.२०१८.

शुध्दीपत्रक

जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-३ (कृषी) संवर्गातील कृषी अधिकारी या पदाची दि. ०१.०१.२०१५ रोजीची अंतिम जेष्ठता सूची संदर्भ क्र .१ येथील परिपत्रकान्वये दि. ४ मे, २०१७ अन्वये प्रसिद्ध करण्यात आली.

२) सन २०१६-१७ निवडसूची वर्षात कृषी विभागाच्या अधिपत्याखालील कृषी आयुक्तालयातील जिल्हा परिषदेकडील जिल्हा तांत्रिक सेवा गट क (ग्रेड वेतन ४४००) संवर्गातून महाराष्ट्र कृषी सेवा गट ब (ग्रेड वेतन ४६००) या संवर्गात पदोन्नती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही कृषी व पदुम विभागाकडून सुरु

आहे. प्रस्तुत संदर्भ क्र.१ येथील ज्येष्ठता सूचीत अ.क्र.१८ वर नमुद श्री.एस.एन.औंधकर, कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद,अमरावती यांच्या दि .१७.११.२००७ रोजीच्या आदेशानुसार जिल्हा परिषद , अमरावती येथे आंतर संभागीय बदलीने रूजू झाल्याने त्यांची सेवाज्येष्ठता सुधारणा न झाल्याबाबत संदर्भ क्र . २ येथील पत्रान्वये, उप सचिव, कृषी व पदुम यांनी खुलासा मागितला होता. त्यावर संदर्भ क्र.३ येथील ग्रामविकास विभागाच्या पत्रान्वये, उप सचिव,कृषी व पदुम यांना श्री .औंधकर यांच्या सेवाज्येष्ठता सूचीत नियमित नियुक्ती दिनांकात, दि.३०.०३.१९९८ ऐवजी दि .०७.१२.२००७ अशी दुरूस्ती यानंतर प्रसिध्द होणाऱ्या (दि.०१.०१.२०१७ रोजीच्या) सेवाज्येष्ठता सूचीत करण्याचे कळविण्यात आले होते.

३. दिनांक ०१/०१/२०१५ रोजीच्या ज्येष्ठता सुचीमध्ये अनुक्रमांक १८ येथे श्री.एस.एन.औंधकर, कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या आंतर जिल्हा बदलीने सेवा ज्येष्ठता यादीत सुधारणेबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्यानुसार जिल्हा परिषद अमरावती यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार श्री.औंधकर यांची प्रादेशिक दुय्यम सेवा व निवड मंडळ यांनी शिफारस केल्यानुसार जिल्हा परिषद , वर्धा येथे दि .३०.०३.१९९८ रोजी प्रथम नियुक्ती झाली होती . तद्नंतर श्री. औंधकर यांची दिनांक १७/११/२००७ रोजीच्या आंतर संभागीय बदली आदेशाव्दारे (आंतर जिल्हा बदलीने) जिल्हा परिषद अमरावती येथे बदली करण्यात आली . त्यानुसार श्री.औंधकर हे दिनांक ०७.१२.२००७ रोजी जिल्हा परिषद, अमरावती येथे हजर झाले. त्यामुळे श्री.औंधकर यांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र जिल्हा परिषदा (सेवा) नियम १९६७ मधील नियम ६ (८) (३) नुसार दिनांक ०७.१२.२०१७ पासून निश्चित होणे आवश्यक आहे.

४. उक्त वस्तुस्थितीनुसार, दि.०१.०१.२०१७ रोजीच्या सेवाज्येष्ठता सूचीत श्री .एस.एन. औंधकर यांच्या नियमित नियुक्ती दिनांकात ३०.३.१९९८ ऐवजी दिनांक ७.१२.२००७ अशी सुधारणा करण्यात येत असून, त्यानुसार त्यांचे स्थान , अ.क्र.८३ वरील श्री.एस.एन.चौगुले यांचे खाली व श्री.सी.एस.देशमुख यांचेवर **अ.क्र.८३ (अ)** वर निश्चित करण्यात येत आहे. याबाबतचा सेवा तपशील सोबत जोडण्यात येत आहे. (विवरणपत्र संलग्न)

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१७११२२४०३७२० असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vivek Ramesh Shinde

Digitally signed by Vivek Ramesh Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=98222e73b61528cee875e0cab75e02437703c365921479fb0198fcf43d79d224, serialNumber=3d2f2d59501068679dd214122d63cb4d2d18b76f5a89cae6eca0162ae6701444, cn=Vivek Ramesh Shinde
Date: 2019.07.19 12:51:20 +05'30'

(वि.र. शिंदे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचे स्वीय सहायक.
२. उप सचिव, कृषी व पदुम विभाग, (कार्या.-१५ अे), मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५.
४. उपायुक्त (आस्था.), विभागीय आयुक्त, अमरावती
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती.
६. श्री.एस.एन.औंधकर, कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती.
७. निवडनस्ती

जिल्हा परिषदेतील जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (कृषी) संवर्गातील कृषी अधिकारी यांची दि.०१/०१/२०१७ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची.

(शासन शुध्दीपत्रक क्रमांकः जिपअ-२०१८/ प्र.क्र.१६/आस्था-४, दि.१७.०७.२०१८ सोबतचे विवरणपत्र)

सुधारीत ज्येष्ठता क्रमांक	कर्मचाऱ्याचे नाव	जिल्हा परिषद	विभाग	जन्म दिनांक	शैक्षणिक अर्हता	पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक	जात प्रवर्ग	शेरा
८३ अ	श्री.एस.एन.औंधकर	अमरावती	कृषी	१२-०८-१९६३	बी.एस्सी (कृषी)	**०७.१२.२००७**	भज-ब	-